**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६८५/२०२२ मधील नि.१ वरील आदेश</u>**

**समाबाई किसनराव धनवडे आणि ईतर विरुध्द निरंक**

**[CNR NO. MHBIO 800-1594-2022]**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जदारांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे.

२. अर्जदाराचे क्र १ चे पती अर्जदार क्र २ व ३ चे पिता व अर्जदार क्र. ४ चा मुलगा नामे किसन गंगाराम धनवडे यांचा मृत्यू **दि. २५.०२.२००८** रोजी श्रृंगारवाडी, ता. माजलगाव जि. बिड येथे झालेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नाही. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारातर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली.

४. अर्जातील बाबींना व अर्जदाराच्या युक्तीवादास अनुसरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

<u>मुद्दा क्र १ बाबत</u>

५. अर्जदारांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ अर्जदार क्र ३ अशोक धनवडे यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१०), मयताचे मृत्यु प्रमाणपत्र नि. क्र ०६ वर दाखल केले असुन, अर्जदारांच्या व मयताच्या आधार ओळखपत्राच्या प्रती नि.क्र ४ च्या यादीसोबत दाखल केलेल्या आहेत. वर्तमानपत्रातील जाहीर प्रगटनाची प्रत नि.क्र.०९ वर दाखल केली आहे. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आसलयाचे

दिसुन येते.

६. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी **दि. २४.१०.२०२२** रोजी दै.माजलगाव टाईम्स (नि.क्र.०९) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. परंतु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत या अर्जदारांच्या कथनाास आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

७. अर्जदार क्र १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. तसेच अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत त्यांनी आवश्यक तो पुरावा सादर केलेला आहे. अर्जदारांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये, मयतास अर्जादारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस आहेत हे सिध्द होते. त्यामुळे मी मुद्दा क्र १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुण, मुद्दा क्र २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र. १ समाबाई भ्र. किसनराव धनवडे, २. कांचन पि. किसन धनवडे, ३. अशोक पि. किसन धनवडे व ४. इंदाबाई भ्र. गंगाराम धनवडे हे मयत किसन पि. गंगाराम धनवडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस–प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

३) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

दिनांक : ०७.१२.२०२२.
ठिकाण : माजलगाव.

**( एम.ए.कुलकर्णी )**
४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
माजलगाव.